PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Saadhi Manas
Year: 1965

Song: Vaat Pahuni Jeev Shinala
Lyricist: Yogesh

वाट पाहूनी जीव शिनला
दिसामागूनी दिस टळला
वाट पाहूनी जीव शिनला
दिसामागूनी दिस टळला
सुर्व्या आला तळपून गेला
मावळतीच्या खळी गालाला हो...
गडनी सखे गडनी

कुटं गुंतला सब्द इसरला
देऊन आपुल्या सजनीला
कुटं गुंतला सब्द इसरला
देऊन आपुल्या सजनीला आ...
डोंगर वलंडून चांद चालला
चांदनं चारुन धरतीला
सुर्व्या आला तळपून गेला
मावळतीच्या खळी गालाला
गडनी सखे गडनी

मासं जोडी जोडीनं पवती
पाखरं संगती संगतीनं फिरती
मासं जोडी जोडीनं पवती
पाखरं संगती संगतीन फिरती
एका ढाळीवर बिलगून फुलती
फुलं कळया त्या येलाला
सुर्व्या आला तळपून गेला
मावळतीच्या खळी गालाला हो...
गडनी सखे गडनी
वाट पाहूनी जीव शिनला
दिसामागूनी दिस टळला
सुर्व्या आला तळपून गेला
मावळतीच्या खळी गालाला हा...
गडनी सखे गडनी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*